सिस्टर आणि वॉर्ड बॉय पाहिजे.
शिक्षण व अनुभवनुसार पेमेंन्ट
दिले जाईल.
डॉ. घुगे ऑरोकेअर सुपर स्पेशालिटी
हॉस्पिटल रामनाथ-अलिबाग
संपर्क- ८३९०४५५५६५/९९२३५०६७७९/
७५०६३२९९११

# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹

## अभिनेता रणजीत पाटील यांचे निधन

**मुंबई :** मराठी सिनेसृष्टीतून एक दुख:द घटना समोर आली आहे. दिग्दर्शक आणि मराठी अभिनेता रणजीत पाटील यांचे निधन झाले आहे. त्यांनी वयाच्या ४२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मिळालेल्या माहितीनुसार, रणजीत पाटील यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. गेल्या काही महिन्यांपासून त्यांना हृदयाच्या निगडीत समस्या भेडासावत होत्या. त्यांच्या निधनाची बातमी कळताच कलाकार, अभिनेते आणि दिग्दर्शकांना मोठा धक्का बसला आहे. तरूण वयात रणजीत पाटील यांचे निधन झाल्यामुळे मराठी मनोरंजन विश्वात शोककळा पसरली आहे.

(छायाचित्र : समीर मालोदे)



## हुकूमशाहीविरोधात रणशिंग फुंकले

# आगामी लढ्यासाठी सज्ज व्हा

### शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणूकीत तीन उमेदवार वगळता महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसला चांगले यश मिळाले. निवडणूकीचा निकाल समाधानकारक आहे. या निवडणुकीनंतर महाविकास आघाडीत एक परिवर्तन झाले आहे. नगराध्यक्ष उच्च शिक्षित असून अनेक भाषांवर प्रभूत्व असणारी आहे. ती चांगले काम करणारी नगराध्यक्ष आहे. शेतकरी कामगार पक्षाची बांधिलकी गोरगरीब, कष्टकऱ्यांसोबत आहे. त्यांना केंद्रबिंदू ठेवून शेकापने काम केले आहे. आपण जनतेचे सेवक आहोत, या भावनेतून काम करायचे आहे. संविधान तसेच लोकशाही जगली पाहिजे, यासाठी महाविकास आघाडी निर्माण करण्यात आली आहे. आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत एकत्र येऊन मोठ्या ताकदीने लढण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.**

- **सुप्रिया पाटील, चित्रलेखा पाटील यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात**
- **हजारो कार्यकर्त्यांची सभागृहात उपस्थिती**

शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील व शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचा वाढदिवस सोहळा सोमवारी (दि.२२) शेतकरी भवन येथील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी जयंत पाटील बोलत होते.

यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, द्वारकानाथ नाईक, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, जिल्हा सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, अलिबागचे नवनिर्वाचित नगरसेवक तथा माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, कामगार आघाडीचे प्रमुख प्रदिप नाईक, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडीच्या प्रमुख शिवानी जंगम, संतोष जंगम, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, ॲड. उमेश ठाकूर, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, प्रमोद घासे, ॲड. सचिन जोशी, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, ॲड. परेश देशमुख, ॲड. विजय पेढवी, अनिल शांताराम पाटील, अनिल गोमा पाटील आदींसह जिल्हा, तालुक्यातील वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार तसेच विविध क्षेत्रातील मंडळी, कार्यकर्ते, महिला व तरुण मंडळी हजारोच्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संदीप जगे यांनी केले. तर, प्रास्ताविक विक्रांत वार्डे यांनी केले.

यापुढे मार्गदर्शन करताना जयंत पाटील म्हणाले की, प्रशांत नाईक यांनी अलिबाग नगरपालिका चांगल्या पतीने सांभाळली आहे. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत त्यांनी चांगले काम केले आहे. त्यांचे काम खऱ्या अर्थाने कौतूकास्पद आहे. आजचा वाढदिवस व सन्मान सोहळा हा कौटूंबिक असून या भव्यदिव्य सोहळ्यातील उपस्थिती पाहून भारावून गेलो आहे. अलिबाग नगरपरिषदेमध्ये तीन जागा गेल्याचे दुःख झाले असून खंतही वाटत आहे. याबाबत एकत्रित बसून आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. ज्या जागा गेल्या, त्या जातील अशी अपेक्षा नव्हती. आपण अलिबाग शहराचा चेहरा-मोहरा बदलण्याचे काम केले आहे. पान २ वर

सविस्तर वृत्त पान ३ वर

#### नगराध्यक्ष, नगरसेवकांचा सन्मान

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या नवनिर्वाचित नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यामध्ये नगराध्यक्षा अक्षया नाईक, नगरसेवक प्रशांत नाईक, ॲड. मानसी म्हात्रे, ॲड. निलम हजारे, अनिल चोपडा, सुषमा पाटील, संतोष गुरव, संध्या पालवणकर, डॉ. साक्षी पाटील, आनंद पाटील, ॲड. निवेदिता वाघमारे, समिर ठाकूर, ॲड. ऋषीकेश माळी, ॲड. अश्विनी ठोसर, योजना पाटील, सागर भगत, शैला भगत, वृषाली भगत यांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला.



# एका वडिलांना २६८ मुले?

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया सुरू असतानाच प्रभाग क्रमांक २ मधील अंतिम मतदार यादीत उघड झालेल्या धक्कादायक घोळामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. एका व्यक्तीच्या नावाखाली तब्बल २६८ मुलांची नोंद आढळून आल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे या प्रकरणाला आता गंभीर वळण मिळाले असून शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी थेट उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली आहे.



- **पनवेल मतदारयादीतील घोळ चव्हाट्यावर**
- **शेकापची उच्च न्यायालयात धाव**

> **एका वडिलांना २६८ मुले दाखवणे म्हणजे मतदार यादीची थट्टा असून लोकशाही प्रक्रियेचा थेट अपमान आहे. बाहेरील लोकांची नावे मतदार यादीत घालून निवडणुकीत गैरव्यवहार करण्याचा हा प्रयत्न आहे.**
>
> **– अरविंद म्हात्रे,**
> **माजी नगरसेवक, शेकाप**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना नुकतीच अंतिम मतदार यादी उपलब्ध करून देण्यात आली. त्याच दरम्यान ही धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. त्यात एका वडिलांच्या नावाखाली असामान्य संख्येने मुलांची नोंद आढळल्याने मतदार यादीच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भात शेकापचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेत त्यांनी नमूद केले आहे की, या २६८ नावांपैकी बहुसंख्य तरुण हे उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशातील असून, संबंधित व्यक्ती प्रत्यक्षात पनवेलमध्ये वास्तव्यास नाहीत. तरीही त्यांची नावे एकाच पत्त्यावर मतदार म्हणून नोंदवण्यात आल्याचा आरोप त्यात करण्यात आला आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ प्रशासकीय चूक नसून, आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीवर प्रभाव पान २ वर

## शेख हसीना यांच्या विरोधकावर गोळीबार

**। ढाका । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशमध्ये निवडणुकांची घोषणा झाली असून सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या प्रचाराला लागले आहेत. अशातच राजकीय नेत्यांवरील हल्लेदेखील वाढले आहेत. उस्मान हादीनंतर आता शेख हसीना यांच्या आणखी एका कट्टर विरोधकावर गोळीबार झाला आहे. मोतलेब सिकंदर असे या नेत्याचे नाव असून ते नॅशनल सिटीझन पार्टीचे प्रमुख नेते असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार बांगलादेश येथील खुलना येथे सोमवारी (दि.२२) निवडणूक प्रचार सुरू असताना मोतलेब सिकंदर यांच्यावर गोळीबार करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. पान २ वर

## कार झाडावर आदळली, तिघांचा मृत्यू

### मुंबई-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मुंबई-नागपूर महामार्गावर मलकापूरजवळ कारवरील नियंत्रण सुटल्याने भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात कारमधील तिघेजण जागीच ठार झाले असून दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर धुपेश्वर होऊन मलकापूरकडे येणाऱ्या कारचा भीषण अपघात झाला. कारचालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट रस्त्यालगत असलेल्या झाडावर आदळली. ही धडक इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. या अपघातात रुद्र उमेश पवार व विनायक जनार्दन अत्तरकर या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर, प्रशांत राजू वडारे, गणेश दीपक इंगळे आणि तक्ष धुरंधर हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत. या तिघांनाही पुढील उपचारासाठी अकोला येथील रुग्णालयात हलवण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान गणेश दीपक इंगळे या तरुणाचा मृत्यू झाला. त्यामुळे अपघातातील मृतांचा आकडा तिघांवर पोहोचला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त वाहन हटवून घटनेचा पंचनामा करण्यात आला. प्राथमिक तपासात अतिवेग आणि नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचे समोर आले आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य केले.




### को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक प्रकरणात सनसनाटी खुलासा

## कस्टोडियनच्या बेकायदेशीर कारवायांमुळे ठेवीदारांची फसवणूक?

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील रोहा शहरातील को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेच्या अवसायक प्रक्रियेत मोठा घोटाळा उघड झाला आहे. बँकेच्या कस्टोडियनने बेकायदेशीरपणे बँकेची मौल्यवान मालमत्ता विक्री केल्याचा आरोप होत असून, त्यामुळे ठेवीदारांच्या हक्कांवर गदा येत असल्याचे समोर येत आहे. या प्रकरणात राजकीय नेत्यांचा हात असल्याची कुजबुज सहकार क्षेत्रात सुरू आहे. ठेवीदारांनी न्याय मागण्यासाठी उपोषणाची धमकी दिली असून, या घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

- **बेकायदेशीरपणे मालमत्ता विक्री करण्याचे आरोप**
- **ठेवीदारांकडून न्यायासाठी उपोषणाचा इशारा**

रोहा शहरातील को-ऑपरेटिव्ह अर्बन ही सहकारी बँक कर्ज पुरवठा आणि ठेवीदारांना जास्त व्याज देणारी बँक म्हणून ओळखली जात होती. मात्र, बँकेचे संचालक मंडळ रोहा नगरपरिषदेच्या नगरसेवक आणि अध्यक्षांच्या ताब्यात असल्याने, या बँकेचा राजकारणासाठी दुरुपयोग होऊ लागल्याचे बोलले जात आहे. त्यात अपात्र कर्जदारांना कर्जे देणे, जुने कर्ज नवे करणे, नफा योग्य रीतीने न काढणे आणि ठेवीदारांनी ठेवी काढून घेणे यामुळे २००७ च्या सुमारास बँक आर्थिक अडचणीत सापडली होती. त्यानंतर बँकेवर प्रशासक आणि नंतर अवसायक नेमण्यात आले. त्यावेळी राजकीय नेत्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत बँक वाचवण्यासाठी प्रयत्न करीन, अशा गर्जना केल्या होत्या. मात्र, बँक अवसायक प्रक्रियेत गेली आणि १ लाख पान २ वर

## घटस्फोट घेतल्याचे सांगून महिलेची फसवणूक

### लैंगिक अत्याचार करून पैसेही लुबाडले

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

लग्न जुळवणाऱ्या सांकेतीक स्थळावर घटस्फोटित असल्याची माहिती देऊन पनवेलमध्ये राहणाऱ्या व्यक्तीने अलिबाग परिसरात राहणाऱ्या एका महिलेला लग्नाची मागणी घालून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे या व्यक्तीने पीडित महिलेची आर्थिक व भावनिक फसवणूक केल्याचे देखील उघडकीस आले. रोहन चिंतामण शिंदे (३८) असे त्याचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपासासाठी पनवेल शहर पोलीस ठाण्याकडे वर्ग केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रोहन शिंदे याने लग्न जुळवणाऱ्या एका सांकेतीक स्थळाच्या माध्यमातून पीडित महिलेच्या प्रोफाईलवर संपर्क साधत गोड बोलून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने तिला लग्नाचे आमिष दाखवत गेल्या चार महिन्यांत पनवेलमधील दोन लॉजमध्ये नेऊन तसेच तिच्या घरी जाऊन तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध निर्माण केले. या कालावधीत त्याने पीडित महिलेच्या मोबाईलमध्ये पान २ वर






कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



पान १ वरून

## आगामी लढ्यासाठी सज्ज व्हा

अधिक वेगळ्या पध्दतीने अलिबागचा विकास करून शहराचा एक वेगळा कायापालट करण्याची भूमिका आहे. या निवडणूकीत आपल्याला ८२ टक्के मते पडली आहेत. यामध्ये सर्वात महत्वाचे म्हणजे नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक यांना सर्वाधिक मते मिळाली आहेत. अलिबाग शहरातील काही भागांमध्ये वाहतूक कोंडी होत आहे. ही कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. पाणी प्रश्नदेखील सोडविला जाणार आहे. पर्यटन वाढीबरोबरच नागरिकीकरण देखील वाढत आहे. एमएमआरडीए अंतर्गत असणाऱ्या नगरपालिकांना मुंबईचा दर्जा मिळाला पाहिजे. त्या पध्दतीने काम होणे गरजेचे आहे, असे जयंत पाटील यांनी सांगितले. अलिबागमध्ये स्व.मधूकर ठाकूर, नारायण भगत असे अनेक आमदार होऊन गेले. त्यांनी अलिबागचे नाव उंचावण्यासाठी अथक प्रयत्न केले. मात्र सध्या सत्तेसाठी लोकप्रतिनिधींचा दर्जा खालावत असल्याचं दिसून येत आहे, असा टोला शिंदे गटातील आमदार महेंद्र दळवी यांना नाव न घेता जयंत पाटील यांनी लागवला.

## एका वडिलांना २६८ मुले?

टाकण्यासाठी जाणीवपूर्वक करण्यात आलेला गंभीर गैरप्रकार असल्याचा दावा देखील याचिकेत करण्यात आला आहे. या याचिकेद्वारे अरविंद म्हात्रे यांनी, उच्च न्यायालयाकडे संबंधित मतदार यादीची तातडीने सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याचे आदेश द्यावेत, बनावट व संशयास्पद नोंदी तत्काळ रद्द कराव्यात, तसेच या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर व संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे.

## शेख हसीना यांच्या विरोधकावर गोळीबार

त्यांच्या मानेला गोळी लागली आणि त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेनंतर हल्लेखोर फरार झाला असून, त्याला पकडण्यासाठी पोलिसांनी नाकाबंदी केली. दरम्यान, एनसीपी नेत्या महमूदा मितू म्हणाले की, एनसीपीचे खुलना मंडळ प्रमुख मोतलेब सिकंदर यांच्यावर गोळीबार करण्यात आला आहे. त्यांची प्रकृती गंभीर असून त्यांना खुलना मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले आहे.

## घटस्फोट घेतल्याचे सांगून महिलेची फसवणूक

लोन ॲप डाउनलोड करून तिच्या नावावर परस्पर कर्ज घेतले. तसेच, सिनेमागृहात चित्रपट पाहत असताना तिच्या गळ्यातील सोनसाखळी काढून घेतल्याचे देखील उघडकीस आले. त्यानंतर रोहन याने त्याच्या पत्नीशी घटस्फोट घेतला नसल्याचे पीडित महिलेच्या लक्षात आले आणि तिने खांदेश्वर पोलीस ठाण्यात त्याच्या विरोधात तक्रार दाखल केली. गुन्ह्याचे घटनास्थळ पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत येत असल्याने त्यांनी हा गुन्हा पनवेल शहर पोलिसांकडे वर्ग केला आहे.

## कस्टोडियनच्या बेकायदेशीर कारवायांमुळे ठेवीदारांची फसवणूक?

रुपयांपर्यंतच्या ठेवीदारांना ठेव संरक्षण विमा महामंडळामार्फत पैसे मिळाल्याने त्यांचा आक्रोश थांबला. परंतु, त्यापेक्षा जास्त रकमेच्या ठेवीदारांना, विशेषतः सहकारी संस्थांना, त्यांच्या ठेवी अद्याप मिळालेल्या नाहीत. बँकेच्या संचालक आणि कर्जदारांवर कारवाई होऊन त्यांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या. बँकेकडे करोडो रुपयांच्या जप्त मालमत्ता असून, या मालमत्ता विकून ठेवीदारांना पैसे परत करणे हे अवसायकाचे मुख्य काम होते. मात्र, सहकार खात्याने कायद्याचा चुकीचा अर्थ लावून बँकेची नोंदणी रद्द केली आणि कस्टोडियनची नेमणूक केली. महाराष्ट्र सहकारी संस्था नियमांनुसार, परीसमापन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लक्षात न आलेली मालमत्ता आणि दाव्यांची कार्यवाही कस्टोडियनने करायची असते. तरीही, कस्टोडियनने कर्जदार आणि संचालकांच्या मालमत्ता ताब्यात घेण्याऐवजी बँकेच्या ताब्यातील मालमत्ता बेकायदेशीरपणे विकण्याचे पाऊल उचलले. या कारवाईमुळे ठेवीदारांच्या हक्कांवर गदा येत असल्याचा आरोप आहे. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थांनी या प्रकरणाचा अहवाल पाठवला असून, त्यात कस्टोडियनने योग्य प्रक्रिया न राबवल्याचे नमूद केले आहे. सहकार खाते आणि पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरज असून, लवकरच याबाबत मोठी कारवाई होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की खालील वर्णन केलेली जमीन मिळकत. सदर जमीनीचे मालक श्री. नितू विलास गावंड रा घर नं. ४६४. मोठापाडा. मरुआई मंदीराजवळ. चिंचपाडा. वडघर, पनवेल -४१०२०६ यांचे मालकीची व त्यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीची ७/१२ सदरी त्यांचे नावे असलेली भोगवटादार वर्ग १ ची मिळकत जमिन मौजे - पिंपळपाडा, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड या गावी आहे. त्यामिळकतीचे वर्णन खाली लिहीले प्रमाणे.

**मौजे पिंपळपाडा. तालुका कर्जत जिल्हा - रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| सर्वे नं./हि.नं. | क्षेत्र. हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४६/१/३१ | ०-३१-९० | ०-५९ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत झाडझाडोऱ्या सुद्धा सर्व हक्क हितसंबधासह सदर जमीनीचे मालक यांचे कडुन खालील सही करणार यांनी विकत घेण्यांचे ठरले असून त्याबाबत बयाणा पावती झालेली आहे. सदर जमीन मालक यांनी सदर वर वर्णन केलेली जमीन दुसरे कोणास कोणत्याही हक्काने म्हणजे साठेकरार, बयाणा पावती, हक्कसोड पत्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण दान बक्षिस खरेदी वगैरे दिलेली नाही. अगर दुसरे कोणास कोणत्याही हक्कांने दिलेली नाही. अगर तोंडी अगर लेखी करार केलेला नाही. जर करता सदर मिळकतीबाबत कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत असल्यांस त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासुन १४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनी लेखी पुरावे सादर करावेत. जर करीता सदर मुदतीस कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत न आल्यांस सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित अशी समजुन सदर मिळकतीचे रजिस्टर खरेदी खत केले जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारीस व हरकतीस खालील सही करणार हे जबाबदार राहणार नाही करीता सदर जाहिर नोटीसीने कळवित आहे.

तारीख : २२/१२/२०२५

सही/-
**श्री. अशोक दत्तात्रेय महाडिक**
रा-दहीवली तर्फे नीड, तालुका-कर्जत,
जिल्हा - रायगड
मो. ९०६७८९००७९

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १) मधुकर तुकाराम माळी<br>२) प्रमोद अण्णा माळी<br>३) रविना रविंद्र मसणे<br>४) एकता उर्फ सविता नाथा बागडे | ९३ | २ | १-७५-२०<br>पैकी ०-४०-०० | ६.०८ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २३/१२/२०२५

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता : कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१. कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो. : ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

### - जाहीर नोटीस -

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे सुचित करणेत येते की, आमचे अशिल श्री. भगवान दत्तात्रेय वैशंपायन, रा. खानाव, ता. अलिबाग, जि. रायगड आणि रा. १०७, नातू रिजन्सी, श्रीराम मंदिराजवळ, अलिबाग-रायगड, यांच्याकडे त्यांच्या वडिलांचे काळापासून, खुद ताबेकब्जात असलेल्या व खुद मालकीच्या असणाऱ्या मौजे खानांव, ता. अलिबाग येथील सर्व नं. ६३/२+३, सर्वे नं. ३३/३, सर्वे नं. २९/३ आणि गावठाण पडी नं. ४ अशा सर्व मिळकत असून, त्या मिळकतींशी आमचे अशिलांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कसलाही, काहीही हक्क आणि ताबा नाही. सदर मिळकतींसंदर्भात आमचे अशिलांनी अलिबाग दिवाणी न्यायालयात श्रीमती छाया गजानन ठोसर, वगैरे यांचेविरूद्ध मालकी हक्क प्रस्थापनेसाठी व निरंतर मनाई हुकूमासाठी नियमित दिवाणी दावा नं.५०/२०११ चा दावा दाखल केला होता. परंतू तो दावा मे. न्यायालयाने दिनांक ३०.१०.२०२३ रोजी फेटाळल्याने, आमचे अशिलांनी अलिबाग येथील मे. जिल्हा न्यायालयात पहिले दिवाणी अपील नं. १२/२०२४ चे अपील दाखल केले आहे व ते न्यायप्रविष्ट असून, प्रलंबित आहे. म्हणजेच दाव्याचा वाद अपिलाकामी सुरू आहे. आजही वर नमूद सर्व मिळकतीं आमचे अशिलांच्याच खुद्द ताबेकब्जा व वहिवाटीत असून, त्या मिळकतींशी अन्य कोणाचाही, कोणत्याहीप्रकारे हक्क नाही. अशी वस्तुस्थिती असतानाही, सदर दावा व अपीलातील प्रतिवादी/उत्तरार्थी हे वर नमूद मिळकतींसंदर्भात खोटी व चुकीची माहिती देऊन व खोटेपणाने ताबा सांगून, गैरप्रकारे व अनाधिकाराने, दलालांमार्फत सदर वर नमूद मिळकतींबाबत हस्तांतरणाचे व्यवहार करणेचा प्रयत्न करीत आहेत व तशा जोरदार हालचाली त्यांनी परस्पर सुरू केल्याचे आमचे अशिलांना समजले आहे. सबब या नोटीसने तमाम जनतेस असे कळविणेत येते की, वर नमूद मिळकतींसदर्भातील न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निकाल होईपर्यंत वर नमूद मिळकतींतील आमचे अशिलांचे मालकीहक्कास व ताब्यास हरकत वा बाधा निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करू नये आणि त्या मिळकतींसंदर्भात श्रीमती छाया गजानन ठोसर, वगैरे यांचेबरोबर अगर त्यांचे प्रतिनिधींबरोबर कोणीही, कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार करू नये. वर नमूद मिळकतीसंदर्भात कोणीही, कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार केल्यास, तसा कोणताही व्यवहार हा मे. न्यायालयाचे अंतिम निकालास अधीन असेल आणि तो आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तसेच तसा कोणताही व्यवहार कायदेशीर कारवाईस पात्र असेल व आमचे अशिल हे सर्व संबंधित व्यक्ती/खरेदीदार यांचेविरूद्ध वर नमूद अपीलाचे कामी योग्य ती दाद मागतील, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांकः - २२.१२.२०२५.

सही/-
**(ॲड. सुरेंद्र नारायण जोशी)**
कार्यालय- अ-१०१/१११, त्रिमुर्ती प्लाझा,
बीच रोड, अलिबाग को. ऑप. अर्बन बँकेसमोर,
अलिबाग, जि. रायगड, ४०२२०१.

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
RDCC Bank Let's grow together
**निविदा सूचना**

बँकेच्या चिरनेर, ता. उरण या शाखेकरीता मोकळी जागा/बांधकाम केलेली जागा/नव्याने विकसित होणारी २००० ते ३००० चौ. फुट जागा स्व मालकी तत्वावर घेणेची आहे.

इच्छुक जागामालकांनी आपल्या निविदेमध्ये मालकी हक्काने देण्यात येणाऱ्या जागेच्या प्रती गुंठा दराचा स्पष्ट उल्लेख करावा.

शर्ती व अटी

१. वर नमूद करणेत आलेल्या मालकी हक्काने घेण्यात येणाऱ्या जागेत पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र सुविधा असावी.
२. वाहनाच्या पार्किंगची व्यवस्था होण्यासाठी मोकळी जागा असणे आवश्यक आहे.
३. सदर मोकळी जागा ही चिरनेर येथेच असलेल्या निविदेस प्राधान्य देण्यात येईल.

वर उल्लेखिलेल्या सर्व बाबी, अटी व शर्तीसह पूर्ण करून शकणाऱ्या सहकारी संस्था/जागामालक यांचेकडून निविदा मागविणेत येत आहे.

अधिक अटी व शर्ती बँकेच्या प्रशासन व आस्थापन विभागामध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

तरी इच्छुकांनी आपल्या निविदा दिनांक ३१.१२.२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत खालील सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यात. एक किंवा सर्वच निविदा नाकारणेचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळास राहील.

ठिकाण : केंद्र कार्यालय अलिबाग — सही/-
दिनांक : २३.१२.२०२५ — उपमुख्य कार्यकारी अधिकारी

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, नेवाळी तर्फे वासरे ता. कर्जत जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील कुसुम विठ्ठल आहेर व आशा राय या वसंत जोहिरीलाल मुनोत या विद्यमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १३ | १ | ०-६०-०० गुंठे | ०-७० |

सदरील जमिन मिळकतीची चतुःसिमा येणेप्रमाणे पुर्वेस नदी, पश्चिमेस -स नं १३/२ जसमीन कौर दक्षिणेस नं १५/१ भगवान सखाराम कदम, उत्तरेस-स नं ९/५ सीमरन कौर

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क, पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहिवाट, अथवा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
२३/१२/२०२५
मो. नं ९२८४६७७५१६
८३९०७८९५९९

आशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

Nandnaher@gmail.com

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
RDCC Bank Let's grow together
**निविदा सूचना**

बँकेच्या एकूण ४ शाखांकरीता मित्सुबीशी व ब्ल्यु-स्टार या कंपनीचे १ टन, १.५ टन व २ टन ए.सी. खरेदी करणेचे आहेत.

त्याकरीता नामांकित कंपन्या उदा. मित्सुबीशी व ब्ल्यु स्टार ए.सी. पुरवठादार यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत.

इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक ३१.१२.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यात. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ठिकाण : केंद्र कार्यालय अलिबाग — सही/-
दिनांक : २३.१२.२०२५ — उपमुख्य कार्यकारी अधिकारी

### मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड
**ई-निविदा सुचना सन २०२५-२६**
म्यु.जा.क्र. ७८१/ई-निविदा/मु.न.प. २०२५-२०२६

मा. प्रशासक तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून १. मुरुड नगरपरिषद हद्दीतील लक्ष्मीखार समाज मंदिर बांधणे व पायाभुत सुविधा करणे. (1"CALL) या कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी-शर्ती : http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २३/१२/२०२५ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक ३१/१२/२०२५ आहे.

दिनांक : २२/१२/२०२५

(शिक्का)

सही/-
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

### जाहिर नोटीस
**अलिबाग येथील मा. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात.**

रे.मु.नं. ६९/२०१४.

श्रीमती. रामायबाई हिरा शेटी,
मयत तर्फे वारस
श्री. बाळकृष्ण हिरा शेटी, वगैरे ५ — वादी

**विरुद्ध**

श्री. विवेकानंद उर्फ रघुनाथ धर्मा भगत, वगैरे २. — प्रतिवादी

प्रति,
श्री.सचिन विवेकानंद भगत,
शेवटचा माहित असलेला पत्ता
मु. गवाण, ता. पनवेल,
जि.रायगड,

यांस,

ज्याअर्थी सदर दाव्याचे कामी तुम्ही प्रतिवादी नं.१/१.

आणि ज्याअर्थी तुम्हास तुमचे मुळ गाव आग्राव, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील तसेच वर गवाण तालुका पनवेल येथील पत्त्यांवर नमूद केलेल्या वारंवार न्यायालयाचे समन्स काढले असता ते न बजावता परत आले आहेत.

आणि ज्याअर्थी मुळ प्रतिवादीचे वारस म्हणून तुमची उपस्थिती सदर दाव्याचे कामी आवश्यक आहे.

त्याअर्थी तुम्हास याद्वारे असे कळविण्यात येत आहे की, तुम्ही जेथे कोठे असाल तेथून सदर दाव्याचे कामी ता. ५/१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मा. न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

नेमून दिलेल्या तारखेस तुम्ही मे. न्यायालयात हजर होण्यास व तुमचा पत्ता देण्यास कसूर केल्यास तुम्हास सदर दाव्याचेकामी स्वारस्य नाही व तुम्हास तुमच्या बचावाकरीता काहीएक सांगावयाचे नाही, असे गृहित धरून तुमचेविरुद्ध दाव्याचे काम एकतर्फी चालविण्यात येईल व गुणवत्तेवर निर्णय देण्यात येईल, हे तुम्हास कळावे.

अलिबाग
तारीख : १२/१२/२०२५.

**लिपिक**
**दि.न्या.क.स्तर अलिबाग**

(कोर्टाचा शिक्का)

सही/-
**अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर अलिबाग**

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की तलाठी सजा पाबळ हद्दीतील मौजे कोंढवी, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. जगदीश गोपीनाथ ठाकुर यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. मयुर महादेव नाईक यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट न./ हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कोंढवी | ५ | ०.७३.६०<br>पो.ख ०.१६.२०<br>एकुण क्षेत्र ०.८९.८० | ९.८७ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी श्री. मयुर महादेव नाईक यांच्या हिश्याचे क्षेत्र ०.१६.८० हे.आर. आकार १.५० रु.पै. इतके क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण: पेण
दि.२३/१२/२०२५

सही
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं. ९८२२०३०३८९

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे इंद्रपै, ता. अलिबाग येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दामोदर सदाशिव गोगटे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| इंद्रपै | ९९ | ०-१२-२०<br>पो.ख.०-००-४०<br>०-१२-६० | ३.०१ |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २३/१२/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे खारगाव, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट नं. व उपविभाग क्र. १६३, एकूण क्षेत्र ००-०७-८०, आकार ०.८१ लागवड - गवतपड, इतक्या क्षेत्राची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक मिल्का मिलींद पोलेकर, मनाली पांडुरंग खोत, रसिका रमेश नागवेकर, नैतिक रमेश नागवेकर अ.पा.क आई रसिका, विराज रमेश नागवेकर अ.पा.क आई रसिका, अस्मी रमेश नागवेकर अ.पा.क आई रसिका सर्व राहणार मु. खारगाव, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांसोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हदी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने ) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : २२/१२/२०२५

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील

### जाहिर हरकत

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे आशिल सौ.मानसी राकेश चव्हाण, रा.ठिकरूळ नाका, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी खाली वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचा करार दिनांक १७/११/२०१७ रोजी मिळकतीचे विद्यमान मालक श्री. धनंजय कृष्णा म्हात्रे यासोबत केला आहे व सदरच्या करारापोटी मिळकतीचे मालक श्री. धनंजय कृष्णा म्हात्रे यांनी आमचे आशिलांकडून करारापोटी जमिन मिळकतीचा मोबदला म्हणुन रक्कम स्विकारलेली आहे.

आमचे आशिल आजही मिळकतीचे विद्यमान मालकांसोबत मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यास तयार आहेत. परंतु सदर जमिन मिळकतीचे मालक आमचे आशिलांस अंधारात ठेवून सदर मिळकतीचा व्यवहार बेकायदेशीरपणे त्रयस्थ इसमांसोबत करत आहेत. असा कोणताही व्यवहार सदर मिळकतीबाबत श्री.धनंजय कृष्णा म्हात्रे वगैरे करत असल्यास सदरच्या व्यवहारास आमचे आशिलांची सक्त हरकत आहे.

खालील नमुद मिळकतीचे विद्यमान मालकांनी मिळकतीचा व्यवहार त्रयस्थ इसमांसोबत केल्यास तो व्यवहार आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर जमिन मिळकतीच्या व्यवहाराबाबत आमचे आशिल कायद्याने योग्य ती फौजदारी व दिवाणी स्वरूपाची कारवाई जमिन मिळकतीच्या विद्यमान मालकांविरूद्ध करण्यास बांधिल राहतील याची नोंद घ्यावी. हे सर्वास कळावे.

**वर नमुद मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| बामणोली, ता.अलिबाग | २३६ | ०-२१-३०<br>पो.ख. ०-०५-८०<br>एकूण क्षेत्र ०-२७-१० | ६.०६ |

अलिबाग
दिनांक : २२/१२/२०२५

**ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
मो.नं. ९८२२०१७१६१

### जाहीर नोटीस

दिनांक २२/१२/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्रीमती मंगल लक्ष्मण ठाणगे वगैरे | ८८/२ | ०-७९-९० | १-५० |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस,
ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण ठोंबरे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ६२ | ७ | ०-०४-००<br>पो. ख. ०-०१-३० | ०-०५ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल साठेखत अथवा खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. २३/१२/२०२५

**ॲड. सुमीत दत्तात्रेय कराळे.**
पत्ता - नेरळ पोलीस स्टेशन जवळ,
कर्जत - कल्याण हायवे, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९१६८९७८४३८.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक श्री. अभय शांतीलाल शहा वगैरे १, रा. मुंलुंड मुंबई यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - चिखलगाव, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ५१/१ | ०-६८-८० | ८.८१ |
| ५२/३ | १-१७-०० | १.४५ |
| ५३/२ | ०-८६-५० | २.०१ |

वरील शेती मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २०/१२/२०२५

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

### महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ
### रायगड विभाग, पेण

क्र. राप/रायगड/वा/वाणिज्य/११३१ — दिनांक २२/१२/२०२५

**निविदा सूचना क्र. ०१/२०२५**

विभाग नियंत्रक, म.रा.मा.प. महामंडळ, रायगड विभाग, पेण-रामवाडी हे खालील निर्देश केलेल्या बसस्थानकावरील/मार्गनिवाऱ्यावरील वाणिज्य आस्थापनांकरिता व्यवसायापोटी मासिक मोबदला मिळून होणाऱ्या मासिक परवानाशुल्क रकमेवर "लिव्ह अँड लायसन्स" तत्वानुसार चालविण्यास देण्यास मोहोरबंद निविदा मागवित आहे.

कोरे छापील तांत्रिक व आर्थिक निविदा फॉर्म/अटी व शर्ती फॉर्म जामीनदार संमतीपत्र तसेच विक्री करावयाचे पदार्थांची यादी इत्यादी तपशील विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रायगड, पेण-रामवाडी येथे दि.२३.१२.२०२५ ते दि. १२.०१.२०२६ या कालावधीत दररोज शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडून इतर दिवशी १०.३० ते १५.०० या वेळेत स्नॅकबारकरिता रू. ११८०/- वस्तु व सेवाकर १८% सहित व इतर स्टॉलकरिता रू.५९०/- वस्तु व सेवाकर १८% सहित विहित शुल्क व बयाणा रक्कम भरले नंतरच निविदा फॉर्म मिळतील. मार्गस्थ निवाऱ्यातील चहा दुकानासाठी निविदा अर्ज बयाणा रक्कम भरले नंतर मोफत देणेत येतील. दि. १२.०१.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत निविदा फॉर्म व बयाणा रक्कम स्विकारणेत येईल. दि. १२.०१.२०२६ रोजी १५.०० वाजल्या नंतर निविदा फॉर्म दिले जाणार नाहीत, तसेच बयाणा रक्कम स्विकारली जाणार नाही.

निविदा स्विकारण्याची शेवटची दिनांक १३.०१.२०२६ रोजी १४.०० वाजेपर्यंत राहील व निविदा पेटी सिल केल्यानंतर उशिरा प्राप्त झालेल्या निविदा निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येतील. अपूर्ण नोंदी असलेल्या स्वाक्षरी नसलेल्या व आवश्यक मुळ कागदपत्रे निविदा सोबत न जोडल्यास निविदा अपात्र समजण्यात येईल. निविदा शक्यतो दि. १३.०१.२०२६ रोजी १५.३० वाजेपर्यंत उघडण्यात येतील.

| अ. क्र. | ठिकाण | वाणिज्य आस्थापना प्रकार | जागेचा तपशिल चौ. फूट | जागा बांधीव/मोकळी | अपेक्षित रक्कम | बयाणा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वडखळ | टी स्टॉल | १२६ | बांधीव | ८११९/- | ९७४२८/- | वाहतूक नियंत्रक शेजारील गाळा |
| २ | आवास | टी स्टॉल | १२६ | बांधीव | ११००/- | १३२००/- | मार्गनिवाऱ्यातील गाळा |
| ३ | साजगांव | टी स्टॉल | १२६ | बांधीव | ६९२/- | ८३०४/- | मार्गनिवाऱ्यातील गाळा |
| ४ | इंदापूर | दूरध्वनीकक्ष | ६४ | मोकळी | १०३/- | १२३६/- | बसस्थानकाच्या उजव्या बाजूची मोकळी जागा |
| ५ | अलिबाग | दूध व दुग्धजन्य स्टॉल | ३७ | मोकळी | २४४/- | २९२८/- | उपहारगृहाच्या शेजारील जागा |
| ६ | श्रीवर्धन | उस रसवंतीगृह | ३०० | मोकळी | ७८२/- | ९३८४/- | बसस्थानकाच्या जवळील जागा |
| ७ | वडखळ | गिफ्ट सेंटर | १५० | मोकळी | ६२०/- | ७४४०/- | वडखळ बसस्थानकाच्या उजव्या बाजूला असलेली मोकळी जागा |
| ८ | वडखळ | केश कर्तनालय | १०० | मोकळी | ४५०/- | ५४००/- | वडखळ बसस्थानकाच्या उजव्या बाजूला असलेली मोकळी जागा |
| ९ | वडखळ | जनरल प्रोव्हिजन सेंटर | ८० | मोकळी | ५६०/- | ६७२०/- | वडखळ बसस्थानकाच्या उजव्या बाजूला असलेली मोकळी जागा |

सही/-
विभाग नियंत्रक
रा.प. रायगड विभाग, पेण

# जल्लोष विजयाचा... सत्कार नवनिर्वाचितांचा!

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या महाविकास आघाडीतील शेकाप–काँग्रेसच्या नवनिर्वाचित थेट नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचा सत्कार सोहळा शेतकरी भवन येथील सभागृहात उत्साहात पार पडला. निमित्त होते अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील व शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या वाढदिवसाचे. त्याचे औचित्य साधत शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने अभीष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी सुप्रियाताई पाटील आणि चित्रलेखाताई पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचितांच्या विजयाचा जल्लोष साजरा केला.




















## जनसेवेचा वारसा जपण्यासाठी कटिबद्ध : ॲड. मानसी म्हात्रे



आजचा दिवस हा शहरासाठी दुग्धशर्करा योग आहे. हा दिवस प्रेरणा दिवस आहे. सुप्रिया पाटील आणि चित्रलेखा पाटील यांच्या रुपाने सासू-सुनेचे नाते कसे असावे, हे एक उत्तम उदाहरण आहे. बऱ्याच भावनांची उलगड झाली. त्यात सर्वप्रथम पक्षनिष्ठा होती. वारसा आणि संस्कराची जाणीव ठेवून सुप्रिया पाटील व्यक्त झाल्या. हा संस्काराचा वारसा सुप्रियाताई आणि चिऊताई खंबीरपणे चालवित आहेत. काल झालेल्या नगरपरिषदांच्या निवडणुकीत निवडून आलो. यामध्ये पक्ष नेतृत्वाला आणि शहरातील सर्वांचे लाडके प्रशांत नाईक यांना श्रेय दिले जात आहे.

तो वसा, संस्कृतीचा वारसा सुप्रिया पाटील, सुनीता नाईक, स्व. नमिता नाईक आणि आता अक्षया नाईक जपत आहेत. महाराष्ट्रात सर्वाधिक मताधिक्य मिळवून अलिबागचे नाव अक्षया नाईक यांनी राज्यामध्ये कोरले आहे. जनसेवेचा वारसा जपण्याची संधी मिळाली. शहराच्या विकासासाठी तो कारभार पुढे सक्षमपणे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जाईल. या निवडणुकीत किंगमेकर प्रशांत नाईक यांनी त्यांचा आदर्श दाखवून दिला आहे. उमेदवारांना निवडून आणण्यासाठी पडद्यामागे राहून  नृपाल पाटील यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनातून काम करून अलिबागचे नाव एक वेगळ्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न राहील, असे प्रतिपादन शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले.

## शिंदे गटाला उत्तर जनतेनेच दिले : चित्रलेखा पाटील



आजचा दिवस खऱ्या अर्थाने एक वेगळ्या स्वरुपाचा व आनंद देणारा आहे.इतकी वर्षे सातत्य राखणे सोपे नाही. प्रशांत नाईक यांनी आपल्या कर्तृत्वाने पक्षाला विजय मिळूवन दिला आहे. त्यांच्या नेतृत्वाला सलाम आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातील शेकाप व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी स्वतःला झोकून देऊन काम केले आहे. सर्वांनी घेतलेल्या मेहनतीमुळे हा विजय मिळाला आहे. नगरपरिषदेचा कारभार आजपर्यंत स्वच्छ व पारदर्शक राहिला आहे, असेच आगामी काळातदेखील काम राहील, असा विश्वास आहे. सुप्रिया पाटील यांच्या रुपाने एक नंबरची सासू मिळाली आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, अशा अनेक क्षेत्रात चढ-उतार पाहिले आहेत. मात्र, खचून न जाता, दुसऱ्या दिवशी पुन्हा जोमाने काम करण्यास सुरुवात केली. शेकापचे नेते जयंत पाटील यांनी सक्षम राहण्यास शिकवले. अलिबाग तालुक्यासह मुरूड, रोहा तालुक्यात शिंदे गटाकडून घाणेरडे राजकारण केले जात होते. या नगरपरिषद निवडणुकांमधून जनतेने उत्तर दिले आहे. रायगड जिल्हा परिषद निवडणुकीसाठी विजयाचा नारळ फुटला आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागून या निवडणुकीत एक वेगळा इतिहास घडवूया, रायगड जिल्हा परिषदेच्या जास्तीत जास्त जागांवर आपले वर्चस्व ठेवण्यासाठी आतापासूनच काम करूया, असे आवाहन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले.

## पक्षावर असेच प्रेम, निष्ठा ठेवा : सुप्रिया पाटील



शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्या संकल्पनेतून आजचा हा वाढदिवस सोहळा साजरा करण्यात आला आहे. त्यांच्या आग्रहाखातर सोहळा आयोजित केला आहे. पाटील कुटुंबियांवर व पक्षावर असलेल्या प्रेमाखातर आज कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमले आहेत. पक्षावर असेच प्रेम, निष्ठा ठेवा, असे आवाहन रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील यांनी केले.

दरम्यान, शेकापचे नेते स्व. प्रभाकर पाटील यांच्यासोबतच्या जुन्या आठवणींना सुप्रिया पाटील यांनी उजाळा दिला. एक लाडकी सून म्हणून ते मला बोलत असत, असे त्यांनी सांगितले. जयंत पाटील यांच्याबरोबर राजकारणात झोकून देऊन काम करत आहे. स्व. प्रभाकर पाटील यांच्यामुळे ते शक्य झाले. पक्षामुळे आज मला अनेक पदे मिळाली आहेत. पक्षासाठी काम करत राहणे, हे माझे कर्तव्य आहे, अशी ग्वाही यावेळी सुप्रिया पाटील यांनी दिली.

## प्रभावी काम करणाऱ्या ताई : सुरेश खैरे



अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाला चांगले यश मिळाले आहे. महाराष्ट्रामध्ये सर्वात तरुण नगराध्यक्ष म्हणून अक्षया नाईक निवडून आल्या आहेत. त्यामुळे अलिबागची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. आज सुप्रिया पाटील आणि चित्रलेखा पाटील या सासू-सुनेचा वाढदिवस नसून, मायलेकीचा वाढदिवस साजरा होत आहे. सुप्रिया पाटील यांनी सामाजिक, राजकीय अशा अनेक क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून त्यांनी प्रभावीपणे काम केले आहे. शैक्षणिक, पत्रकारिता या क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. अलिबाग अर्बन बँकेला ऊर्जितावस्थेत आणण्याचे काम त्यांनी अध्यक्ष म्हणून सक्षमपणे केले आहे. चित्रलेखा पाटील अर्थात चिऊताई यांनी अगदी कमी कालावधीत राजकीय वलय निर्माण केले. त्यांनी एक वेगळा ठसा उमटविला आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आदी क्षेत्रात त्यांचे प्रभावी काम आहे, असे गौरवोद्गार शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी काढले.

## आगामी काळात विजय प्रेरणादायी ठरणार : प्रदीप नाईक



शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्या संकल्पनेतून आजच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रियाताई पाटील तसेच चित्रलेखा पाटील यांचा आज मोठ्या उत्साहात वाढदिवस साजरा करण्यात आला. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या पाठीशी भक्कमपणे उभ्या असणाऱ्या सुप्रियाताईंबद्दल एक वेगळा आदर आहे. चिऊताई अर्थात चित्रलेखा पाटील यांच्यामुळे शेतकरी कामगार पक्षाला तालुक्यात एक वेगळा जोश निर्माण झाला आहे. चित्रलेखा पाटील यांच्या प्रेरणेमुळे कार्यकर्त्यांना बळ मिळाले आहे. विधानसभा निवडणुकीत अपयश मिळाले असताना खचून न जाता, समाजसेवेसाठी त्या पुन्हा कामाला लागल्या. त्यामुळे पक्षामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. त्यांच्याकडून मिळालेल्या प्रेरणेमुळेच ते शक्य झाले आहे. चित्रलेखा पाटील या सर्व क्षेत्रात काम करीत आहेत, असे गौरवोद्गार कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक यांनी काढले. ते पुढे म्हणाले की, नगरपरिषद निवडणुकीचा निकाल समाधानकारक आहे. प्रशांत नाईक यांच्यामुळे यश प्राप्त झाले आहे. तीन जागांच्या पराभवाला सामोरे जावे लागले. त्याबाबत आत्मपरीक्षण करून पुन्हा त्याच उमेदीने काम करू. आगामी निवडणुकीत पालिका निवडणुकीचा हा विजय प्रेरणादायी ठरणार आहे. अक्षया नाईक या तरुण नगराध्यक्ष आहेत. स्व. नमिता नाईक यांच्या कन्या आहेत. त्यांचा वारसा अक्षया नाईक या खंबीरपणे जपतील, असा विश्वास आहे, असे प्रदीप नाईक यांनी सांगितले.

## समाजसेवेचा ध्यास असणाऱ्या ताई : सुरेश घरत



अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीचा निकाल काल जाहीर झाला. कालच्या विजयाने अलिबागचे नाव महाराष्ट्रात कोरले गेले आहे. आजचा दिवस हा एक आगळावेगळा आहे. पडद्यामागे राहून काम करणाऱ्या, मोठेपणा नसलेल्या सुप्रियाताई पाटील यांनी अनेक पदे भूषविली आहेत. जमिनीवर पाय ठेवून मायेची ऊब देऊन त्यांनी सर्वसामान्यांच्या हिताचे काम केले आहे. सुप्रियाताई यांची भाची अक्षया नाईक यांनी कमी वयात अलिबागच्या नगराध्यक्षा बनण्याचा बहुमान संपूर्ण महाराष्ट्रात मिळविला आहे. सुप्रियाताई यांचा वाढदिवस आणि नगराध्यक्ष व नगरसेवक यांचा सन्मान सोहळा हा एक सुवर्ण संगम आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करणाऱ्या चित्रलेखा पाटील आहेत. चित्रलेखा पाटील या गोरगरीबांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी सतत धडपडणाऱ्या नेत्या आहेत. जनतेसाठी निःस्वार्थी सेवा करणाऱ्या आहेत. अनेकांना मदतीचा हात देऊन उभारी देण्याचे काम चित्रलेखा पाटील यांनी सक्षमपणे केले आहे. समाजसेवेचा ध्यास कायम असणाऱ्या सुप्रियाताई पाटील आणि चित्रलेखाताई पाटील यांचे कार्य मोलाचे आहे, असे गौरवोद्गार शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी काढले.






## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२३ डिसेंबर**

१) श्री नीलकंठ गोविंद पाटील चेंढरे-अलिबाग, २३-१२-१९३५
२)श्री.यशवंत लक्ष्मण पाटील चाळमाळा अलिबाग, २३-१२-१९३७
श्रीम.पुष्पलता परशुराम काळण चेंढरे-अलिबाग २३-१२-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. श्री. निलेश घरत, स्मरणार्थ अलिबाग**

# पाणी, विजेअभावी पारसिक हिलवरील सार्वजनिक स्वच्छतागृहाची दुर्दशा

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

स्वच्छ, सुरक्षित व सुसज्ज सार्वजनिक स्वच्छतागृहे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असताना, देशातील स्वच्छ शहरांच्या यादीत सातत्याने पुढे असणाऱ्या नवी मुंबईत मात्र वास्तव पूर्णतः वेगळे चित्र दाखवत आहे. पारसिक हिल, बेलापूर येथील सार्वजनिक स्वच्छतागृहाची अवस्था अत्यंत दुर्दैवी, धोकादायक व प्रशासनाच्या बेपर्वाईचे प्रतीक ठरत आहे.

पारसिक हिल परिसरात मॉर्निंग वॉकसाठी येणारे नागरिक, पोलीस भरतीची तयारी करणारे तरुण, तसेच संध्याकाळी विरंगुळ्यासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी केवळ एकच सार्वजनिक स्वच्छतागृह उपलब्ध आहे. मात्र या एकमेव स्वच्छतागृहाची दैनंदिन देखभाल पूर्णतः दुर्लक्षित असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

स्वच्छतागृहात पाणीपुरवठा अनियमित असून वीज कनेक्शन जाणीवपूर्वक तोडून ठेवलेले दिसते. त्यामुळे सायंकाळनंतर या ठिकाणी पूर्ण अंधार असतो. ही परिस्थिती केवळ अस्वच्छच नव्हे तर विशेषतः महिलांसाठी अत्यंत असुरक्षित आहे. तुटलेल्या वायरिंग, प्लास्टर उडालेले छत व दुर्गंधी यामुळे स्वच्छतागृहाचा वापर करणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळच ठरत आहे.



### तक्रारीनंतरच पालिका यंत्रणेला जाग

पारसिक हिलवरील त्रिस्तरीय वृक्षारोपण पाण्याअभावी अखेरच्या घटका मोजत असल्याबाबतचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर पालिकेने तातडीने टँकरने पाणी पुरवठा केला. त्याचे स्वागतच आहे परंतु, स्वतः हून पालिका प्रशासनाला जाग का येत नाही? हा नागरिकांचा आर्त सवाल आहे. याचा अर्थ पालिकेची यंत्रणा तक्रारीनंतरच जागी होते, अन्यथा नागरिकांच्या हालअपेष्टांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जाते.

त्यामुळे असा प्रश्न उपस्थित होतो आहे की, स्वच्छतागृहांच्या दैनंदिन देखभाल-दुरुस्तीसाठी लाखो रुपयांची कंत्राटे दिली जात असताना, पालिका प्रशासनाची नियंत्रक व नियामक यंत्रणा अस्तित्वात असताना, नागरिकांना प्रत्येक वेळी तक्रार का करावी लागते? कंत्राटदार काम करतात की फक्त कागदावर बिले सादर करतात? यापूर्वीही सजग नागरिक मंचाने सेक्टर-१ बेलापूर भाजी मंडई शेजारील स्वच्छतागृहाबाबत तक्रार केल्यानंतरच तेथे तातडीने वीज मीटर बसवण्यात आला व पाण्याचे कनेक्शन देण्यात आले होते. आता तिथे दिवसभर अनावश्यक पद्धतीने लाईट सुरू असल्याचे दिसते. यामुळे पालिका प्रशासनाला झाले आहे तरी काय? हा प्रश्न अनुत्तरीत राहत असल्याची भावना नागरिकांची झालेली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका प्रशासन स्वच्छ सर्वेक्षणाच्या काळातच स्वच्छतेची दिखाऊ कामे करत असल्याचे वारंवार दिसून येते. दिल्लीहून सर्वेक्षण पथक येणार असेल तेव्हाच स्वच्छतागृहांची आठवण होणे ही ढोंगी स्वच्छतेची सवय आता उघड झाली आहे.

> प्रशासक राजवट असताना आणि लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेप नसतानाही नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासकीय दर्जाचे गंभीर अधःपतन झालेले दिसत आहे. आयुक्तांचा धाक ना अधिकाऱ्यांवर आहे, ना कंत्राटदारांवर. याची किंमत मात्र सामान्य नागरिकांना मोजावी लागत आहे.
> - ॲड. हिमांशू काटकर, सजग नागरिक मंच, नवी मुंबई

पारसिक हिलवर मॉर्निंग वॉकसाठी येणारे नागरिक विष्णू खंदारे यांनी मागणी केली आहे की, पालिकेने स्वच्छतागृहांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी दिलेल्या सर्व कंत्राटांचा तपशील अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करावा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अकस्मित भेटी देऊन प्रत्यक्ष वस्तुस्थितीची पाहणी करावी.

## गॅस गळतीमुळे घराला आग

मुंबई : अंधेरी पूर्वेकडील रमाबाई आंबेडकर नगरात गॅस गळती होऊन आग लागली. ही घटना रविवारी घडली.आंबेडकर नगरातील एक तळ अधिक वरच्या मजल्याचे घर असून खालच्या घरात एका महिलेसह दोघे वृद्ध झोपले होते. तर वरच्या घरात दांपत्य व त्यांची मुलगी झोपली होती. सर्वजण झोपी गेल्यानंतर गॅस गळती होऊन खालच्या घरात गॅस पसरला. सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास उठल्यावर महिलेने गॅस शेगडी सुरू करताच आगीचा भडका उडाला. त्यात ती महिला आगीत सापडल्याने जवळपास ६० टक्के होरपळली. तर त्यावेळी घरात असलेले अन्य दोघे किरकोळ जखमी झाले.

## विजयभूमी विद्यापीठात ‘एक भारत हम भारत’ उपक्रम

### जिल्ह्यातील आठ शाळा, महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील विजयभूमी विद्यापीठात ‘एक भारत हम भारत’ या उपक्रमाच्या वतीने, मैत्रेय दादाश्री यांच्या प्रेरणेतून, प्रथमच भारत युवा कॉन्क्लेव्हचे भव्य आयोजन करण्यात आले होते. विजयभूमी विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित या कॉन्क्लेव्हमध्ये रायगड जिल्ह्यातील आठ शाळा व महाविद्यालयांमधील १२०हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता.

कॉन्क्लेव्हची सुरुवात राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका या विषयावरील प्रभावी पॅनल चर्चेने करण्यात आली. त्यानंतर ‘एक भारत हम भारत’ या उपक्रमाचा प्रेरणादायी प्रवास सादर करण्यात आला. पहलगाम येथून सुरू झालेल्या श्रद्धांजली यात्रेपासून, १८ राज्ये व ६१ शहरांपर्यंत पोहोचलेल्या या प्रवासाने राष्ट्रीय एकतेचा संदेश दिला.

‘जे करता ते प्रेमाने करा आणि जे प्रेमाने करता ते राष्ट्रासाठी करा’ या संकल्पनेवर आधारित, विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, संगीत आणि मृत्तिकाकला (क्ले मॉडेलिंग) यांवरील प्रत्यक्ष कार्यशाळा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी भारताच्या विकासासाठी १२ देशभक्तीपर व सामाजिक संदेश देणारी गीते, कृत्रिम बुद्धिमत्ताचे



१२ नाविन्यपूर्ण उपयोग आणि १२ मृत्तिकाकलेतील मॉडेल्स सादर करून भारतासमोरील विविध आव्हानांवर सर्जनशील उपाय मांडले. कार्यक्रमात मानवी साखळी रचून एक भारत, अखंड भारतासाठी सदैव कटिबद्ध राहण्याची शपथ घेण्यात आली. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी दर महिन्याला किमान एक तास राष्ट्रहितासाठी कार्य करण्याचा संकल्प केली. दिवसाचा समारोप विद्यार्थ्यांच्या सादरीकरण व गौरव समारंभाने झाला. याप्रसंगी डॉ. संजय पाडोदे (अध्यक्ष, विजयभूमी विद्यापीठ), कल्पना पाडोदे संचालिका,विजयभूमी आणि अनुराधा गोखले एक भारत हम भारत, डॉ. कुंती नागवेकर, डॉ. हेमंत तडसरकर उपस्थिती होते.

## ‘पैशाने तुटली नाती’ नाट्यप्रयोग

**चिरनेर** : उरण तालुक्यातील वेश्वी येथील रामनाथ मुंबईकर व जयश्री मुंबईकर या दाम्पत्यांनी गुरुवारी (दि.२५) ‘पैशाने तुटली नाती’ हा दोन अंकी नाट्यप्रयोग आयोजित केला आहे. हा नाट्यप्रयोग नवी मुंबई येथील अष्टगंध कलामंचाच्या कलाकारांच्या सादरीकरणातून, वेश्वी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मंगल कार्यालय होळीचा शेत येथे रात्री साडेनऊ वाजता सादर केला जाणार आहे, अशी माहिती अष्टगंध कलामंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे यांनी दिली. उद्योजक रमेश चिंतामण कोळी हे या नाटकाचे निर्मिती प्रमुख आहेत. तर, या नाट्यप्रयोगाला वेश्वी गावातील सर्व मुंबईकर परिवाराचे व ग्रामस्थ मंडळाचे सौजन्य लाभले आहे. नाटकाचे लेखन हसूराम पाटील यांचे असून, नाटकाचे दिग्दर्शन धनेश्वर म्हात्रे व प्रसाद कडू यांनी केले आहे.

## सुमारगडावरील शिडी तुटली

### शासन, स्थानिक लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

**| खेड | प्रतिनिधी |**

खेड तालुक्यातील सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या आणि निसर्गरम्य परिसरात डौलाने उभा असलेल्या ऐतिहासिक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक सुमारगड किल्ल्यावर जाण्यासाठीची लोखंडी शिडी तुटली आहे. त्यामुळे गडावर जाण्याचा शिवभक्तांचा संपर्क तुटला. तुटलेल्या लोखंडी शिडीची दुरुस्ती करुन गडावर जाण्याचा मार्ग मोकळा करून शिवभक्तांना दिलासा द्यावा, अशी मागणी शिवभक्तांनी केली आहे.

सुमारगडावरील लोखंडी शिडी कोसळल्याची माहिती तात्काळ वाडीमालदे येथील शिवभक्तांनी प्रशासनाला कळवली. परंतु आजपर्यंत प्रशासनाने वा शासनाने याची दखल घेतली नसल्याने शिवभक्तांनी नाराजीचे पडसाद उमटत आहेत. महाराष्ट्रात सध्या शिवशाही सरकार आहे. गडकिल्ल्यांच्या विकासाच्या गप्पा मारल्या जात आहेत. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला सुमारगड आज शासनाला मदतीची हाक मारूनही शासन व स्थानिक लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत असल्याचे आरोप शिवभक्त करत आहेत.

## वार्षिक स्नेहसंमेलन, बक्षीस वितरण सोहळा

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण रोटरी एज्युकेशन सोसायटीच्या रोटरी इंग्लिश मिडियम हायस्कुल व ज्युनिअर कॉलेजचा ३६ वा वार्षिक स्नेहसंमेलन आणि बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी रोटरी इंग्लिश स्कूल व कॉलेजच्या मुलांनी वर्षभर केलेल्या शैक्षणिक प्रगती, क्रीडा व विज्ञान प्रदर्शनामध्ये नेत्र दीपक यश मिळवले. त्याबद्दल त्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष विकास महाजन यांनी शैक्षणिक व क्रीडामध्ये यश मिळवलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विशेष सत्कार रोटरी शाळेची विद्यार्थीनी प्रियांशी मयुर पाटील, हिने भारताचे प्रतिनिधित्व करत



सप्टेंबर २०२५ रोजी सिंगापूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय विंडसर्किंग स्पर्धेत खुला गट या विभागात कांस्य पदक पटकावले व भोपाल व मध्यप्रदेश येथे झालेल्या स्पर्धेत रौप्य पदक पटकावले. याबद्दल तिचा विशेष सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आला. तसेच दरवर्षी नर्सरी व ज्युनिअर केजीला मोफत प्रवेश दिले जात असून यंदाही मोफत प्रवेश दिले जाणार आहे. प्रवेश अर्ज रोटरी शाळेच्या कार्यालयात उपलब्ध असून मोफत प्रवेश संधीचा फायदा पालकांनी घ्यावा, असे शाळेचे अध्यक्ष विकास महाजन यांनी सांगितले.

## परदेशी नोकरीच्या नावाखाली फसवणूक

मुंबई : परदेशात चांगल्या पगाराची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत अनेकांची फसवणूक करणाऱ्या टोळीविरोधात समता नगर पोलिसांनी धडक कारवाई केली. या प्रकरणात बांधकामसह विविध क्षेत्रांत काम देण्याचे आश्वासन देत आरोपींनी प्रत्येकाकडून तब्बल पाच लाख रुपयांपर्यंत रक्कम घेतली. मात्र, आपली फसवणूक झाल्याचे समजताच काही पीडितांनी थेट पोलीस ठाण्यात धाव घेतली. तक्रारीनंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून चौघांना अटक केली. कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपींच्या बँक खात्यांतील १० लाख रुपये गोठवले असून ७० हजार रुपये रोख जप्त केले आहेत.

## ‘महापालिका जिंकण्यासाठी सर्वांनी मैदानात उतरा’

**| मुंबई | प्रतिनिधी |**

संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहाचं वातावरण असून, आगामी महापालिका निवडणुकांसाठी सर्व कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकदीने कामाला लागावे, असे आवाहन शिवसेना नेते युवासेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांनी केले. तसेच राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका होत असून, किती वॉर्ड निवडून आणायचे हे आपल्या मेहनतीवर अवलंबून आहे. गेल्या चार वर्षांपासून ज्याची वाट पाहत होतो, तो काळ आता आला आहे, असही ते म्हणाले.

वरळीमध्ये सादर केलेले प्रेझेंटेशन सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे निर्देश देत, आपण केलेली विकासकामं थेट लोकांपर्यंत नेण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. डिजिटल माध्यमांवर मोठ्या प्रमाणात खोटी माहिती पसरवली जात असून, शिंदे गट व भाजप दिशाभूल करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

मुंबईत रोहिंग्यांचा मुद्दा उपस्थित केला जातो, मात्र केंद्र सरकार नेमकं काय करत आहे, हा खरा प्रश्न असल्याचे आदित्य ठाकरे यांनी नमूद केले. ते म्हणतात आम्ही काम केले, पण आपण केलेली कामं ठोसपणे जनतेसमोर मांडली पाहिजेत, असे ते म्हणाले.

तसेच, सकाळी व संध्याकाळी प्रत्येकी तीन तास दिल्यास जनतेकडून भरभरून आशीर्वाद मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**आरोग्य तपासणीसह शैक्षणिक मार्गदर्शन | डॉ. राजेश पाचारकर यांचे योगदान**

## बोर्लीपंचतन येथे सामाजिक विविध उपक्रम

**| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथे डॉ. राजेश पाचारकर यांच्यामार्फत दि.१७ ते २० डिसेंबर दरम्यान आरोग्य तपासणीपासून शैक्षणिक मार्गदर्शनापर्यंत विविध उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आशा व अंगणवाडी सेविका यांच्याजवळ संवादसाधताना आपल्या परिसरातील बारा वर्षाखालील लहान मुलांना कोणताही गंभीर आजार असेल तर शोध घेण्याचे आवाहन केले. जर असा रुग्ण आढळल्यास त्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे उपचार करू शकत नसल्यास त्याच्या उपचारासाठी शक्य तितके सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. आशा



व अंगणवाडी सेविका बालकांच्या आरोग्य व्यवस्थेतील पहिली पायरी असून त्यांच्या सतर्कतेमुळे अनेक बालकांचे प्राण वाचू शकतात. या आवाहनाला आशा व अंगणवाडी सेविकांनी सकारात्मक प्रतिसाद देत बालकांच्या आरोग्य शोध मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळीडॉ.राजेशपाचारकरमित्र फाउंडेशनमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये सुमारे दीडशे रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये रक्तदाब, रक्तातील साखर, ऑक्सिजन पातळी, शरीराचे वजन आणि इतर वैद्यकीय तपासणीबरोबरच रुग्णांना उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आलं. त्याचबरोबर गरजू रुग्णांच्या आरोग्य सेवेस हातभार लावण्याच्या उद्देशाने प्राथमिक आरोग्य केंद्रास विविध प्रकारची औषधे तसेच प्राथमिक उपचारासाठी उपयुक्त असे वैद्यकीय साहित्य भेट देण्यात आले.

लहान वयातच मुलांना स्वच्छतेच्या सवयी लागाव्यात या उद्देशाने रा.जि.प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना वैयक्तिक स्वच्छता, नियमित हात धुण्याचे महत्त्व, दातांची काळजी तसेच आजारांपासून बचावासाठी स्वच्छतेची भूमिका खाण्याच्या सवयी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना स्वच्छता किट भेट देण्यात आले. याचबरोबर मोहनलाल सोनी विद्यालयातील इयत्ता सातवी ते दहावीच्या विद्यार्थिनींसाठी आरती पाचारकर यांनी मासिक पाळीबाबत उपयुक्त मार्गदर्शन केले. यावेळी दोनशे विद्यार्थीनींना सॅनिटरी नॅपकिन, स्वच्छता किट आणि मासिक पाळीबाबत माहीतीपत्रकांच वाटप करण्यात आले.

> आरोग्य व शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. या दोन्ही क्षेत्रांत सर्वांनी मिळून सातत्याने कार्य करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांनी परीक्षेचा ताण न घेता स्वतःवर विश्वास ठेवून सकारात्मक दृष्टिकोन राखावा.
> - डॉ. राजेश पाचारकर

# निवडक



## खांब शाळेला आदर्श शाळा पुरस्कार

**कोलाड** : ईएसएफई तसेच टाइम्स ऑफ इंडिया यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळेला आदर्श शाळा पुरस्कार देण्यात येतो. ज्ञानांकूर इंग्लिश मेडीयम स्कूलमध्ये शिक्षणाबरोबर महिलांसाठी मेडिकल कॅम्प, महिला सक्षमीकरण करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण दिले जाते. मुलांना मेडिकल चेकअप, मुलांना शिक्षणाबरोबर संस्कार दिले जाते. कराटे क्लास, योगा क्लास, तरुणांसाठी करियर गाइडेन्स, तसेच सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, तसेच वैद्यकीय क्षेत्रात ग्रामीण भागात उत्कृष्ट कार्य करण्यात येत आहे. यामुळे ज्ञानांकुर इंग्लिश मेडीयम स्कूल खांबला महाराष्ट्रातून आदर्श शाळा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्काचे आयोजन नेस्को बॉम्बे एक्सिबिशन सेंटर मुंबई येथे दि. ११, १२ व १३ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमात ज्ञानकूर इंग्लिश मेडीयम स्कूल खांब शाळेला आदर्श शाळा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या स्कूलचे संस्थापक ॲड. रविंद्र लोखंडे, शाळेच्या मुख्यध्यापिका रिया लोखंडे, सोनाली शिंदे, प्रतीक्षा धामणसे, रुपाली मरवडे, दर्शना धनवी, प्रियांका चिकणे, निलेश टवले, ज्ञानेश्वर महाडिक, सायली यांनी मेहनत घेतली.

## शालेय अधिकाऱ्याची आत्महत्या

**ठाणे** : शाळेत प्रशासकीय अधिकारी असलेल्या विवेक माने यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी दीड वर्षानंतर खडकपाडा पोलिसांनी शिक्षिका पत्नीसह तिच्या भावाला अटक केली आहे. कल्याणमधील एका नामांकित शाळेत प्रशासकीय अधिकारी असलेल्या विवेक माने (४४) या तरुणाने ऑगस्ट २०२४ मध्ये राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली होती. या प्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. काही दिवसांपूर्वी विवेकच्या वडिलांनी, मृत्यूपुर्वी आपल्या मुलाने त्याला पत्नीच्या माहेरहून धमक्या येत असल्याचे सांगितले होते, अशी माहिती नातेवाईकांना दिली. त्यानंतर नातेवाईकांनी पोलिसाकडे जप्त केलेल्या मोबाइलबाबत विचारणा केली. यांनतर पोलिसांनी प्रयोगशाळेत तपासणीसाठी धाडलेल्या मोबाइलच्या सीडीआरचा अहवाल मिळवला. या अहवालात आक्षेपार्ह फोटो आणि संभाषण तसेच विवेक याला त्याच्या पत्नीच्या नातेवाईकांनी दिलेल्या धमक्या यांचे कॉल रेकॉर्ड मिळाले. विवेक याची पत्नी नामांकित शाळेत शिक्षिका आहे. पोलिसांनी या पुराव्याच्या आधारे तिच्यासह तिचा भाऊ अक्षय मनोरे याला अटक केली आहे. विवेकच्या मृत्यूस कारणीभूत असलेले त्याचे सासू-सासरे, त्यांची मुलगी यांनाही अटक करण्याची मागणी वडिलांनी केली आहे. विवेकची हत्या केल्यानंतर ती आत्महत्या भासविण्यासाठी त्याला फाशी दिली, असा संशय व्यक्त करून पुढील तपास करण्याची मागणीही करण्यात आली आहे.



## ‘सर्वात मोठे गुरु आपले जीवन’

कर्जत : आपली पहिली गुरु आपली आई, त्यानंतर शिक्षक आणि पुस्तके गुरु असतात. सर्वात मोठे गुरु आपले जीवन आहे आणि अनुभव हे आपले शिक्षक आहेत. नवीन स्वप्न आणि उद्धीष्ठ ठरावा व यश मिळवा, असा महत्वपूर्ण सल्ला सामाजिक कार्यकर्त्या डॉ. श्रुती गोडबोले यांनी विद्यार्थ्यांना दिला. कर्जतमधील महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर शाळेच्या दोन दिवसांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन शाळेच्या प्रांगणात करण्यात आले होते. डॉ. श्रुती गोडबोले यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून स्नेहसंमेलनाचे उदघाट्न करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी दहावी शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व शिक्षीकांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी नृत्य, गीते सादर करून आपली कला प्रदर्शित केली. दुसऱ्या दिवशी वास्तुविशरद राहुल अगज, विजया हांडे या प्रमुख म्हणून उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांनी, विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयीचे महत्व तसेच पालकांना व शिक्षकांना त्यांना घडविण्यासाठीचे मार्गदर्शन करण्यासाठी प्रेरित केले. त्यानंतर मान्यवरांच्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

## सहलीसाठी एसटीला मोठी मागणी

**रत्नागिरी** : रत्नागिरी जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयातील महाविद्यालयांनी शैक्षणिक सहलीसाठी लालपरीलाच पसंती दिली आहे. नोव्हेंबर महिन्यानंतर डिसेंबर, जानेवारी महिन्यात ही एसटी बसेसचे बुकिंग हाऊसफुल्ल झाले आहे. सुमारे ४०० हून अधिक बसेसचे बुकिंग झाले आहे. डिसेंबरच्या पहिल्या १५ दिवसांत कोटींचे उत्पन्न मिळाले होते. जानेवारी महिन्यात ही रत्नागिरी एसटी विभागाला प्रतिसाद मिळाला असल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून यंदाच्या वर्षी शैक्षणिक सहल एसटी बसेसमधूनच करा, असे आदेश काढले आहेत. या आदेशाला जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांनी चांगला प्रतिसाद दिला असून मोठ्या प्रमाणात एसटी बसेस बुकींग केल्या आहेत. नोव्हेंबर महिन्यात तब्बल २०१ एसटी बसेस धावल्या असून उत्पन्नात रत्नागिरी विभाग राज्यात तिसरा आला आहे. दि. १ ते १६ डिसेंबर या १६ दिवसात तब्बल कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. अशी माहिती प्रज्ञेश बोरसे, विभाग नियंत्रक, रत्नागिरी यांनी दिली आहे.

## पर्यावरण सुरक्षाविषयी मार्गदर्शन

**उरण** : कोकण ज्ञानपीठ कला व वाणिज्य महाविद्यालय, उरणच्या एनएसएस विभागाच्या श्रमसंस्कार शिबीर अंतर्गत कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिरकोन येथे फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर उरणतर्फे ‘पर्यावरण रक्षा मानव सुरक्षा’ या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयवंत रामदास ठाकूर व सदस्य राकेश सुरेश शिंदे यांनी पर्यावरण व मानव-वन्यजीव संघर्ष



तसेच सर्प ओळख, सर्पदंश कसे टाळावे व सर्पदंश झाल्यास काय करावे? याविषयी मार्गदर्शन केले. तसेच संस्थेच्या शून्य सर्पदंश मृत्यू अभियान आणि स्नेक बाईट ॲकशन टीम प्रकल्पाबद्दल जनजागृती केली. संस्थेचे सदस्य निकेतन रमेश ठाकूर यांनी सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या मानव-बिबट्या संघर्ष, बिबट्याचे हल्ले वाढत आहेत; त्याची कारणे व त्यावरील उपाययोजना याबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# जेएनपीए मार्गावर अवजड वाहतूक

## सामान्य प्रवाशांचा सतत वाहतूक कोंडीशी सामना; प्रकल्पग्रस्त गावांत अनेक समस्या

**। उरण । प्रतिनिधी ।**

जेएनपीए परिसरातील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी दळणवळण सुरळीत होण्यासाठी जेएनपीए आणि राष्ट्रीय महामार्गाने सहा पदरी रस्ते बनविले आहेत. त्याच बरोबर अपघात कमी होण्याच्या दृष्टीकोनातून छोट्या वाहनांसाठी सेवा रस्ते बनविले आहेत. मात्र, या मार्गांवर छोटी वाहने न चालता रिकामे कंटेनर यार्ड गोदामांच्या अवजड वाहतुकीने त्याचा ताबा घेतला असल्याने अपघातात वाढ होत आहेत. त्यामुळे या सेवा मार्गांवरील अवजड वाहतुकीची पार्किंग बंद करण्यात यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे. जेएनपीए बंदराचीनिर्मिती झाल्यावर या विभागात काही प्रमाणात उद्योगधंदे सुरू झाल्याने काही भूमिपुत्रांना रोजगार मिळाला हे खरे असले तरी जरी रोजगार मिळाला असला तरी प्रकल्पग्रस्त गावांना अनेक समस्या निर्माण झाल्या. या गावांच्या अवतीभवती जेएनपीए बंदरातील माल साठविण्याची अनेक गोदामे सुरू झाली. पर्यायाने या विभागात अवजड वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात सुरू झाली.



अनेक गोदामे बेकायदेशीरपणे उभारण्यात आली आहेत. जेएनपीए आणि एनएचएआयने वाहतूक कोंडी आणि अपघातला पर्याय म्हणून नव्याने सहा पदरी आणि सेवा रस्ते उभारले मात्र या उभारलेल्या सेवा मार्गावर बेकायदेशीर उभारलेल्या गोदामांची अनेक अवजड वाहने रस्त्यावरच पार्कींग करून ठेवण्यात येत आहेत.

तसेच याच मार्गातील सेवा रोडवरून चिर्ले, पुलाखालून धुतूम अंडर पासखालून अवजड वाहने येऊ लागली आहेत. यामुळे वाहतूक कोंडी आणि अपघाताची समस्या उद्भवत आहे. नॅशनल हायवेचे नियोजन शून्य कारभार याच्यातून दिसून येत आहे. याकडेही नागरिकांनी लक्ष वेधले आहे.

द्रोणागिरी नोड, गव्हाणफाट्यावर वाहतूक कोंडीतालुक्यातील द्रोणागिरी नोड, खोपटे कोप्रोली रस्त्यावर, दिघोडे-गव्हाण फाटा रस्त्यावर अनेक अवजड ट्रेलर्स नेहमी बेकायदेशीरपणे उभे असतात. त्यामुळे या प्रवासी रस्त्यांवरून प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, नोकरवर्ग सामान्य जनतेच्या वाहनांना वाहतूक कोंडीचा नेहमी सामना करावा लागतो. पर्यायाने वाहतूक कोंडीतून वाट काढताना अनेक दुचाकी, तिनचाकी स्वार या उभ्या अवजड वाहनांना जाऊन धडकल्याने अनेक अपघात हकनाक होत आहेत. नुकताच भेंडखळ येथील युवकांचा खोपटा पूल नवघर मार्गांवरील बामर लॉरी गोदामा जवळ अपघात होऊन मृत्यू झाला. प्रत्येक गोदाम मालकांनी आपल्या पार्किंगचे नियोजन केले तर रस्त्यावर एकही वाहन उभे राहणार नाही. आज या रस्त्यावरील पार्किंगमुळे अपघात होत आहेत वाहतूक कोंडी तसेच अपघात होत आहेत, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. विद्यार्थी, नोकरवर्ग आणि सामान्य प्रवाशांना सतत वाहतूक कोंडी आणि अपघातांचा सामना करावा लागतो असे स्थानिक नागरिकांचे मत आहे.

### स्वतंत्र पार्किंग झोनची अवश्यकता

सिडकोने अवजड वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग झोन उभारावे आणि रस्त्यावर बेकायदा उभ्या राहणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई करावी. यामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन अपघाती मृत्यू टाळता येतील.



मुरुड समुद्रकिनारी कोळी बांधव मासेमारी करून किनाऱ्यावर परतल्यावर ताज्या मासळीवर ताव मारण्यासाठी सीगल पक्षी व बगळे धाव घेतात. हवेत उडून मासे टिपण्यासाठी कसरत करतात तो क्षण टिपला आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# स्कूल बस चालकांची वैद्यकीय तपासणी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल वाहतुक शाखेतर्फे हद्दीतील स्कुल बस चालक मालकांची वैद्यकिय तपासणी करण्यात आली. पोलीस उप आयुक्त वाहतुक नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली नविन पनवेल वाहतुक शाखा येथिल वपोनि प्रकाश सकपाळ यांचे विदयमानाने लायन्स क्लब, पनवेल यांचे वतीने मेडिकव्हर टीम यांचेद्वारे नवीन पनवेल वाहतुक शाखा येथे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच नवीन पनवेल हद्दीतील स्कुल बस चालक, मालकांची वैद्यकिय तपासणी करून घेण्यात आली. स्कुल बस वरील चालक, मालक हे लहान मुलांना शळेत ने-आण करण्याचे काम करित असतात ते वैद्यकियरित्या सक्षम असणे गरजेचे आहे. त्याकरिता त्यांची वैदयकिय तपासणी करण्यात आली.

## आशा सेविकांना आरोग्यविषयक प्रशिक्षण

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

प्राचार्य डॉ. साजिद शेख व मकरंद कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली लायन्स क्लब ऑफ मुरुड-जंजिरा व लायन्स क्लब ऑफ श्रीबाग यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा येथे तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नेरूळ-नवी मुंबई यांच्या सहकार्याने लाइफलाइन स्किल्स कार्यशाळेद्वारे प्रथमोपचार, मानसिक व महिलांचे आरोग्यविषयक या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयातील १०० विद्यार्थी व मुरुड तालुक्यातील ३५ आशा सेविकांनी प्राची चौलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला. डॉ. अजय बाल्की यांनी मानसिक आरोग्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. वृती शेठ व डॉ. पद्मजा यांनी महिलांचे आरोग्य जागरूकता निर्माण केली. डॉ. विनीत यांनी कार्डिओ पल्मोनरी रेससिटेशनचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लायन्स क्लब मुरुडचे अध्यक्ष सनी सोगावकर, डॉ. फिरोज शेख, प्रा. अल्ताफ फकीर, प्रा. तमसील शहाजहान तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# ओबीसी बहुजन शिक्षक संघाची बैठक

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय ओबीसी शिक्षक संघाची महत्त्वपूर्ण बैठक तुळजापूर येथे उत्साहात पार पडली. या बैठकीत संघटनेच्या बळकटीकरणासाठी आवश्यक असलेल्या विविध संघटनात्मक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



बैठकीत शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आढावा घेण्यात आला. ओबीसी शिक्षकांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे काम करण्यासाठी संघटनेची रचना अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. आगामी काळातील उपक्रम, सदस्य नोंदणी वाढवणे, तालुका व जिल्हास्तरीय कार्यकारिणी अधिक सक्रिय करणे, तसेच शिक्षकांच्या शैक्षणिक व प्रशासकीय अडचणी शासन दरबारी मांडण्याबाबत चर्चा झाली.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या ध्येयधोरणांची माहिती देत एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या बैठकीला संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठक यशस्वीरीत्या पार पडल्याने संघटनेच्या कार्याला नवचैतन्य मिळाल्याची भावना उपस्थितांमध्ये दिसून आली.

सदरची सभा संघटनेचे मार्गदर्शक माजी शिक्षक आ. कोकण विभाग बाळाराम पाटील ॲड. बी. एल. सगर किल्लारीकर माजी सदस्य राज्य मागासवर्गीय आयोग महाराष्ट्र राज्य, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, सरचिटणीस संतोष भोजने, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, धाराशिव जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पळसगाव खुर्दमध्ये श्रमसंस्कार शिबीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने युवा जलक्रांती : शाश्वत विकासाची नवी वाट या संकल्पनेवर आधारित विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



१५ ते २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत हे सात दिवसीय निवासी शिबिर मौजे पळसगाव खुर्द, ता. माणगाव येथे यशस्वीरित्या पार पडले. या शिबिरात सांस्कृतिक मार्गदर्शन, पशुवैद्यकीय तपासणी, कुक्कुटपालन तपासणी व लसीकरण, व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, अंधश्रद्धा निर्मूलन, कायदा व सुव्यवस्था, आत्मसंरक्षण प्रशिक्षण, नेत्र तपासणी, वनराई बंधारा बांधणी अशा विविध नाविन्यपूर्ण व समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरासाठी वैशाली जाधव, अनिल वनगुळे, संतोष सुतार, मनोहर कांबळे, संजना सुतार, पोलीस पाटील, ग्रामस्थ, महिला मंडळाचे सदस्य तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रा. संदेश गावडे, प्रा. भानू प्रसाद विश्वकर्मा, मनोहर कांबळे, गणेश सुतार आदी मान्यवर उपस्थित होते. या संपूर्ण शिबिराचे नियोजन प्रा. नेहा तुराई-गावडे व प्रा. स्वप्निल सकपाळ यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पंकज गायकवाड व सीमा धनसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. स्वप्निल सकपाळ यांनी मानले.

# कुणबी समाजोन्नतीतर्फे दिनदर्शिकेचे प्रकाशन

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा ता. म्हसळा दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन सोहळा बोरिवली येथे रविवारी शाखेचे विद्यमान अध्यक्ष महेंद्र टिंगरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी विद्यार्थी करीअर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. शाखेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. दिनदर्शिका म्हसळा तालुक्यातील ७७ गावांतील प्रत्येक घरामध्ये पोहोचविली जाणार आहे.

कार्यक्रमासाठी महेंद्र टिंगरे, राजू धाडवे, बबन उंडरे, महेश शिर्के, हेमंत रामाणे, अशोक भुवड, अनिल बांद्रे, अनिल काप, अजित उंडे, मनोज मोरे, कल्पेश जाधव, प्रवीण भोगल, अंकुश कांबळे, रुपेश भोगल, उमेश पोटाले, महेंद्र घडशी, विजय बोर्ले, राजाराम गावडे, कृष्णकांत गजमल, राकेश पेंढारी, विलास बोले, नथुराम भुवड, सदानंद आग्रे, दत्ताराम बोर्ले, सुभाष कदम, आदी संघाचे पदाधिकारी, म्हसळा तालुका संलग्न महिला मंडळ, आणि सर्व संलग्न मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

शासकीय वसतिगृहाचा होणार कायापालट | दुरुस्तीच्या कामासाठी निधी मंजूर

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोठा आधार

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यातील बोरघर-हवेली येथे असलेल्या शासकीय वसतीगृहाचा कायापालट होणार असून या वसतिगृहाच्या दुरुस्तीच्या कामासाठी शासनाकडून दोन कोटी नव्व्यांनव लाख एकवीस हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. २००७ साली मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेल्या या वसतिगृहाची दुरवस्था झाल्यामुळे त्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव पाठवण्यात आला होता त्याला मंजुरी मिळाली असून आचारसंहिता संपल्यानंतर जानेवारीच्या



अखेरीस निधी उपलब्ध झाल्यानंतर दुरुस्तीच्या कामाला सुरुवात होणार असल्याचे सांगितले जात आहे.

यामध्ये प्रामुख्याने वसतिगृहाच्या आतील गिलावा, बाहेरील गिलावा, मलनिस्सारण व्यवस्था, लादी बदलणे, दारे व खिडक्या बदलणे, रंगकाम करणे, वसतिगृहावर शेड तयार करणे, संकीर्ण बाबी आदी गोष्टींचा समावेश आहे.

शालेय, महाविद्यालयीन, अभियांत्रिकी आदी शिक्षण घेण्यासाठी तालुक्यात आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तळा तालुक्यातील शासकीय वसतिगृह हा एक मोठा आधार बनला आहे.

> तळा तालुक्यात २००७ साली उभारण्यात आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची दुरवस्था झाल्याने त्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्याला मंजुरी मिळाली असून आचारसंहिता संपली की या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात होणार आहे.
> -गजानन बिहाडे
> गृहपाल शासकीय वसतिगृह तळा

तळा तालुक्यात शिक्षणासाठी आलेल्या इतर तालुक्यातील व जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भाड्याने रूम घेणे, खाणावळ, शैक्षणिक साहित्यांसह इतर खर्च परवडत नसल्याने अशा विद्यार्थ्यांना वसतिगृहाचा आधार मिळतो. तसेच वसतिगृहात राहणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून दरमहा भत्ता, प्रकल्प मदत, सहलीसाठी मदत मिळत असल्याने आर्थिक सहकार्यही लाभत आहे.

## श्रमदानातून बांधला वनराई बंधारा

**कोलाड** : माणगांव तालुक्यातील भाले ग्रामपंचायत हद्दीत ग्रामपंचायतीचे सरपंच दत्ताराम खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियाना अंतर्गत कोणताही निधी उपलब्ध नसतांना लोकसहभागातुन श्रमदानाद्वारे वनराई बंधारा बांधण्यात आला. बंधारा बांधण्यासाठी दगड, माती, रिकाम्या सिमेंटच्या पिशव्या यांचा वापर करून अतिशय कमी खर्च करून हा बंधारा बांधण्यात आला. यावेळी दत्ताराम खांबे, चंद्रकांत शिर्के, बळीराम मंचेकर, शंकर मेढेकर, जयराम म्हसकर, विठ्ठल कदम, जयेंद्र शिंदे, तसेच मंचेकर आळी व माळी आळी येथील असंख्य ग्रामस्थ व महिला वर्ग यांच्या श्रमदानातून हा बंधारा बांधण्यात आला.

## निवडक



### शैक्षणिक साहित्य वाटप

